तक्रार निवारण व्यवस्था

प्रकरण संदर्भ SG/E/2021/09

# पुणे मेट्रो रेल प्रकल्प 2016-0327(भारत)

निष्कर्ष अहवाल

02-04-2024

European Investment Bank | Group

CM Complaints Mechanism

**तक्रार गोपनीय**

नाही

**बहिस्थ वितरण**

तक्रारदार

**अंतर्गत वितरण**

महासचिव
महानिरीक्षक
संबंधित EIB सेवा

**अस्वीकृती**

या अहवालामध्ये सादर केलेले निष्कर्ष EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्थेकडे (European Investment Bank — Complaints Mechanism) 31 जुलै 2023 पर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीवर आधारित आहेत. निष्कर्ष फक्त EIB ला उद्देशून सागितले आहेत.

**EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्था (European Investment Bank — Complaints Mechanism)**

जनतेपैकी एखाद्या व्यक्तीला जर वाटत असले की युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक (European Investment Bank, EIB) ने काही तरी चुकीचे केले असू शकेल, म्हणजेच तिने जर काही गैरकारभार केला असेल, अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठीचे EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्था हे एक साधन आहे. तक्रार निवारण व्यवस्था ही एखादी कायदेशीर सक्त अंमलबजावणी करणारी व्यवस्था नाही आणि ती सक्षम न्यायिक अधिकाऱ्यांच्या न्यायनिर्णयाची जागा घेणार नाही.

गैरकारभार म्हणजे खराब किंवा अयशस्वी कारभार. हे त्या वेळी घडते जेव्हा EIB तिच्यावर बंधनकारक असलेल्या नियम किंवा तत्त्वानुसार कृती करत नाही; यात तिची स्वतःची धोरणे, मानके आणि कार्यपद्धतीसुद्धा समाविष्ट आहेत. गैरकारभाराच्या संकल्पनेत EIB ने मानवी हक्कांचे, लागू कायद्यांचे किंवा सुप्रशासनाच्या तत्त्वांचे पालन न करणे समाविष्ट आहे. गैरकारभाराचा संबंध EIB समूहाचे निर्णय, कृती किंवा कृती न करणे यांच्याशी असू शकतो. यामध्ये EIB चे प्रकल्प किंवा प्रचालन यांचे पर्यावरणीय किंवा सामाजिक परिणाम समाविष्ट असू शकतात.

EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्थेचे एक मुख्य उद्दिष्ट म्हणजे, तुमचे म्हणणे ऐकून घेतले जाणे आणि तक्रार करणे या दोन हक्कांची खात्री करणे आहे. EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्थेबद्दल अधिक माहितीसाठी कृपया येथे भेट द्या:.

# अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ..... iii

संज्ञावली आणि लघुरूपांची सूची ..... iv

कार्यकारी गोषवारा ..... v

1 पार्श्वभूमी ..... 1

1.1 प्रकल्प (Project) ..... 1

1.2 तक्रार ..... 2

1.3 पार पाडलेले काम ..... 2

2 नियामक आराखडा ..... 3

2.1 EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्था (European Investment Bank — Complaints Mechanism) ..... 3

2.2 प्रकल्पाला लागू मानके ..... 4

2.3 EIB च्या जबाबदाऱ्या ..... 4

3 शोध-परिणाम व निष्कर्ष ..... 6

3.1 प्रकल्पाला लागू असलेल्या मानकांचे प्रकल्पाकडून अनुपालन ..... 6

3.2 लागू असलेल्या नियामक आराखड्यासंबंधी EIB चे अनुपालन ..... 6

4 निष्पत्ती आणि सुधारणेसाठी सूचना ..... 9

# संज्ञावली आणि लघुरूपांची सूची

| | |
|---|---|
| कर्जदार (Borrower) | भारताचे प्रजासत्ताक (Republic of India) |
| CYDA | युवक विकास आणि कार्याचे केंद्र (Centre for Youth Development and Activities) (सर्वेक्षण संस्था म्हणून कार्य करते) |
| E&S | पर्यावरणीय व सामाजिक (Environmental and Social) |
| EIB | युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक (European Investment Bank) |
| EIB-CM | युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक (European Investment Bank) – तक्रार निवारण व्यवस्था (Complaints Mechanism) |
| ESDS | पर्यावरणीय व सामाजिक डेटा पत्रक (Environmental and Social Data Sheet) |
| ESIA | पर्यावरणीय व सामाजिक परिणामांचे मूल्यांकन (Environmental and Social Impact Assessment) |
| GoM | महाराष्ट्र शासन (Government of Maharashtra) |
| INR | भारतीय रुपया (Indian rupee) |
| LARR | जमिनीचा ताबा घेणे, दुसऱ्या जागी स्थलांतर आणि पुनर्वसन (Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Resettlement and Rehabilitation) |
| LRF | उदरनिर्वाह पुनःस्थापन आराखडा (Livelihood Restoration Framework) |
| LRP | उदरनिर्वाह पुनःस्थापन कार्यक्रम (Livelihood Restoration Programme) |
| NGO | बिगर-सरकारी संस्था (Non-governmental organisation) |
| PAF | प्रकल्प-ग्रस्त परिवार (Project-Affected Family) |
| PAP | प्रकल्प-ग्रस्त व्यक्ती (Project-Affected Person) |
| PMC | पुणे महानगरपालिका (Pune Municipal Corporation) |
| PMRDA | पुणे महानगर प्रदेश विकास महामंडळ (Pune Metropolitan Region Development Authority) |
| प्रकल्प (Project) | पुणे मेट्रो रेल प्रकल्प |
| प्रवर्तक (Promoter) | महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (Maharashtra Metro Rail Corporation Limited) |
| R&R | पुनःस्थापन आणि पुनर्वसन (Resettlement and Rehabilitation) |
| RAP | पुनःस्थापन कृती योजना (Resettlement Action Plan) |
| RPF | पुनःस्थापन धोरण आराखडा (Resettlement Policy Framework) |
| SC/ST | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (Scheduled Castes and Scheduled Tribes) |
| SMP | सामाजिक व्यवस्थापन योजना (Social Management Plan) |
| SIA | सामाजिक परिणामांचे मूल्यांकन (Social Impact Assessment) |
| SRA | झोपडपट्टी पुनर्वसन महामंडळ (Slum Rehabilitation Authority) |

# कार्यकारी गोषवारा

*पार्श्वभूमीची माहिती*

तक्रार ही “पुणे मेट्रो रेल्वेज” प्रकल्पाशी (प्रकल्प, Project) संबंधित आहे, ज्याला युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेने (EIB) निधीपुरवठा केला असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (प्रवर्तक, Promoter) यांनी केली आहे. प्रकल्पामधील गुंतवणुकीमध्ये पुणे, महाराष्ट्र राज्य, भारत येथे एकूण 31.3 किमी लांबीच्या दोन मेट्रो लाईन्स व 30 स्थानके, तसेच सुमारे 102 मेट्रो कारची खरेदी इतकी गुंतवणूक समाविष्ट आहे.

फेब्रुवारी 2021 मध्ये, EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्थेकडे एका भारतीय नागरिकाकडून एक तक्रार आली, जिचा संबंध प्रकल्पाच्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांशी होता. ऑक्टोबर 2021 मध्ये तक्रारदाराने काही अतिरिक्त स्पष्टीकरणे पुरवली, जी दिवाणी न्यायालय स्थानकाच्या (प्रकल्पामधील एक स्थानक) बांधकामासाठी कामगार पुतळा व राजीव गांधी झोपडपट्ट्यांमधील प्रकल्पग्रस्त लोकांची (PAPs) सक्तीने उचलबांगडी केली जाण्याशी संबंधित होती. तक्रार निवारण व्यवस्थेच्या मार्च 2022 च्या प्राथमिक मूल्यांकन अहवालाला अनुसरून, निकाल अहवाल केवळ दिवाणी न्यायालय स्थानकावरील पुनःस्थापन प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करतो.

आपल्या चौकशीचा भाग म्हणून तक्रार निवारण व्यवस्थेने प्रकल्पाच्या EIB मानकांच्या अनुपालनासह संबंधित आरोपांचा आढावा घेतला, अर्थात्: (1) प्रवर्तकांनी झोपडपट्टी पुनर्वसन महामंडळ (SRA) यांच्याशी योग्य करार न करता अतिरिक्त जमीन ताब्यात घेतली, (2) नुकसान भरपाईसाठी अपात्रता, (3) नुकसान भरपाईची अपर्याप्तता, आणि (4) EIB ला पूर्वसूचना न देता सक्तीने लोकांची उचलबांगडी करणे.

अनुपालनाच्या आढाव्या दरम्यान तक्रार निवारण व्यवस्थेने EIB ने केलेल्या प्रकल्पाच्या मूल्यमापनाचाही आढावा घेतला, विशेषतः: (1) प्रवर्तकांची सामाजिक व्यवस्थापन क्षमता; (2) पुनर्वसन प्रक्रियेमध्ये सहभागी असलेले सद्यकालीन संस्थात्मक आराखडा आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी असलेल्या इतर राष्ट्रीय/स्थानिक एजन्सी; तसेच प्रकल्पावर देखरेख ठेवणे; (3) प्रवर्तकांची सामाजिक क्षमता; आणि (4) दिवाणी न्यायालय स्थानक भागामधील प्रकल्पाच्या सामाजिक अनुपालनाची देखरेख.

*शोधकार्याचे परिणाम व निष्कर्ष*

EIB मानकांच्या प्रकल्पाच्या अनुपालनाच्या संबंधाने, तक्रार निवारण व्यवस्थेने निष्कर्ष काढला की आरोप (1) निराधार आहे. बाकीच्या आरोपांच्या बाबतीत, EIB E&S मानकांचे अनुपालन न केल्याच्या घटना आढळल्या, पण त्या EIB च्या भूमिकेच्या संबंधात निराधार असल्याचे दिसले, कारण पुनर्वसन कृती योजनेच्या (RAP) आणि सक्तीने उचलबांगडी करण्याच्या जागी एकत्रिकृत R&R धोरण आणले गेल्यामुळे त्या घडल्या.

EIB च्या स्वतःची धोरणे आणि कार्यपद्धती यांच्या अनुपालनाच्या बाबतीत:

- मूल्यमापनामध्ये तक्रार निवारण व्यवस्थेने निष्कर्ष काढला की बँकेने पुनर्वसनामध्ये सहभागी असलेला तत्कालीन संस्थात्मक आराखडा/इतर राष्ट्रीय/स्थानिक एजन्सी यांचे मूल्यमापन केले नाही. त्यानुसार EIB एक शिफारस जारी करते.

- देखरेखी दरम्यान बँकेला पुनर्वसनविषयक नवीन दृष्टिकोनाने RAP ची जागा घेतल्याचे किंवा आगामी वैध उचलबांगडी करण्याबद्दल वेळेवर कळवण्यात आले नाही. प्रकल्पाच्या अनुपालनाच्या अधिक स्वयंसंनियंत्रण आणि पडताळणीमुळे सक्त स्थलांतरांचे पूर्वानुमान करण्यामध्ये मदत झाली असती, परंतु कोव्हिड-19 मुळे प्रवासावर पडलेल्या बंधनांमुळे प्रत्यक्ष जागेवर जाऊन भेटी देणे आणि प्रत्यक्ष तेथे जाऊन तपासण्या करणे शक्य झाले नाही. बँकेला कळवताच तिने तिचे देखरेख वाढवली, सामाजिक तज्ज्ञ लोकांना सक्रिय केले आणि चुकांच्या दुरुस्त्या करण्याची विनंती केली.

तक्रार निवारण व्यवस्थेने असेही नोंदवले आहे की EIB सेवांनी (i) एका अंतर मूल्यांकना (Gap Assessment) मार्फत प्रकल्पाच्या सामाजिक परिणामांबाबतच्या माहितीमधील अंतर, आणि (ii) दिवाणी न्यायालय पुनर्वसनाच्या बाबतीत उदरनिर्वाह पुनःस्थापन आराखड्यामार्फत (LRF) EIB मानकांच्या अनुपालनाबाबत EIB च्या चिंता यांच्याकडे अधिक लक्ष देण्यासाठी देखरेखीमध्ये आणखी वाढ केली. LRF ही दिवाणी न्यायालय स्थानकामधील PAP वरील दुष्परिणामांच्या मूल्यांकनामधील आणि पुनःस्थापन धोरणांच्या रचनेमधील एक लक्षणीय सुधारणा आहे. LRF च्या लक्षात आलेल्या अनेक मर्यादा आणि निषेध सूचनांची दखल (जसे, काही PAP नी प्राथमिक सर्वेक्षणामध्ये भाग घेण्यास

नकार दिला) उदरनिर्वाह पुनःस्थापन योजनेच्या (LRP) विकासाचा एक भाग म्हणून घेतली जाईल. या बाबतीत EIB ने प्रवर्तक/LRP सल्लागार आणि राज्य/स्थानिक अधिकारी यांना त्या PAPs शी संपर्क साधून LRP चा विकास आणि अंमलबजावणीची देखरेख करण्याच्या बाबतीत साहाय्य करावे.

अंततः सक्तीची उचलबांगडी आणि LRF ने नोंदलेले तीव्र दुष्परिणाम यांच्यानंतर गेलेला कालावधी विचारात घेता, दोन सारख्याच महत्त्वाच्या उद्दिष्टांमध्ये योग्य समतोल साधणे महत्त्वाचे आहे. एका बाजूला, पुनःस्थापन कार्यक्रम दीर्घ काळ टिकण्याच्या खात्रीसाठी विविध स्टेकहोल्डर्सशी "विचार करणे आणि सहभागी करणे" यासाठी पुरेशा मुक्त अवधीसह LRP विकसित करण्याची गरज. दुसरीकडे, सर्वाधिक असुरक्षित PAP चे ज्या ठिकाणी पुनर्वसन केले आहे अशा जागांवरील सुरक्षिततेबाबतच्या गंभीर चिंतांची आणि त्यांच्यावरील विशिष्ट परिणामांची दखल घेणे व त्यावर अंतरिम उपाय करण्याची निकड, जे आणखी पुढे ढकलून चालणार नाही. यातील दुसऱ्या मुद्द्याच्या बाबतीत एका बहिस्थ पक्षाने मे 2023 मध्ये तयार केलेल्या स्ट्रक्चरल बिल्डिंग ऑडिट रिपोर्टच्या अनुसार पुनर्वसन इमारतींमधील सामाईक भागांमध्ये अत्यंत महत्त्वाची दुरुस्ती आणि पुनर्निर्माण करण्याची कामे SRA तसेच प्रवर्तकांनीही यापूर्वीच पार पाडली आहेत (पाण्याचा प्रवाह वाढवण्यासाठी नवीन पाईपलाईन्स, ओव्हरहेड पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता आणि गळती होत असलेल्या जागा बुजवणे, ड्रेनेज लाईन साफ करून महापालिकेच्या गटारांच्या जाळ्यासोबत जोडणे, लिफ्ट्सची दुरुस्ती). प्रवर्तक हे SRA सह अजूनही सामाईक भागांमधील काही प्रलंबित समस्यांबाबत काम करत आहेत, जसे अग्निशमन उपकरणाची दुरुस्ती.

# 1 पार्श्वभूमी

## 1.1 प्रकल्प (Project)

1.1.1 प्रकल्पामध्ये पुणे, महाराष्ट्र राज्य, भारत येथे एकूण 31.3 किमी लांबीच्या दोन मेट्रो लाईन्स (मेट्रो लाईन 1 व 2) व 30 स्थानके यांची निर्मिती, तसेच सुमारे 102 मेट्रो कारची खरेदी समाविष्ट आहे.

1.1.2 भारतीय प्रजासत्ताक हे कर्जदार आहे (कर्जदार). प्रकल्पाचे प्रवर्तक महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (जिची मालकी संयुक्तरीत्या (50/50) भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांच्याकडे आहे[1].

1.1.3 ऑक्टोबर 2018 मध्ये युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँकेने प्रकल्पाला, त्याच्या €1 770मि इतक्या एकूण खर्चापैकी 34% म्हणजे €600m इतका निधी पुरवठा करून अंशतः निधी पुरवण्याचे मान्य केले. EIB ने तीन वित्तीय करार केले[2]. जानेवारी 2020 मध्ये EIB आणि प्रवर्तक यांनी एका प्रकल्प करारावर सह्या केल्या, ज्याद्वारे प्रवर्तकांनी, कर्जदारांच्या साथीने याची खात्री करण्यासाठी काम करण्याचे मान्य केले, की प्रकल्पाशी संबंधित सर्व अटी EIB चे समाधान होईल अशा स्वरूपात आणि अर्थासह पूर्ण केल्या जातील.

1.1.4 प्रकल्पाला समांतर पद्धतीने Agence Française de Développement ने सहनिधी पुरवला आहे[3].

1.1.5 2017 साली प्रवर्तकांनी दोन सल्लागार कंपनी समूहांशी करार केले. सामाजिक परिणामांचे मूल्यांकन (SIA), पुनर्वसन धोरण आराखडा (RPF) आणि पुनर्वसन कृती योजना (RAP) यांचे मसुदे बनवण्यासाठी एका सामाजिक कंपनी समूहाला करारबद्ध करण्यात आले. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) च्या निर्मितीमध्ये साहाय्य करण्यासाठी आणि पर्यावरणीय परिणाम व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी दुसऱ्या एका कंपनी समूहाशी करार करण्यात आला, ज्या अभियांत्रिकी व पर्यावरणीय परिणाम मूल्यांकने यांमध्ये तज्ज्ञ आहेत (जनरल कन्सल्टंट्स). प्रकल्पाच्या संपूर्ण अंमलबजावणी टप्प्यामध्ये पर्यावरणीय व सामाजिक (E&S) दस्तऐवजांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रवर्तकांनी जनरल कन्सल्टंट्सना काम देणे सुरू ठेवले, ज्यामध्ये एक पर्यावरण तज्ज्ञ, जे सामाजिक मुद्द्यांचाही समावेश करतात, तेही समाविष्ट आहेत. सामाजिक कंपनी समूहासोबतचा करार सप्टेंबर 2018 मध्ये संपुष्टात आला. सप्टेंबर 2019 मध्ये EIB ने मान्य केलेले RAP प्रवर्तकांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले.

1.1.6 ऑक्टोबर 2020 मध्ये SRA ने एका सर्वेक्षणामार्फत कामगार पुतळा व राजीव गांधी नगर येथील दोन मुख्य झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांची पुनर्वसनाच्या दृष्टीने पात्रता ठरवण्याचे, ज्यामध्ये इतरांबरोबरच महा-मेट्रोच्या प्रकल्पाने ग्रस्त असलेले परिवारही (PAFs) येतात, जे सर्व जण पुनर्वसनासाठी दिवाणी न्यायालय भागामधीलच आहेत, ठरवले. जरी SRA ची अंतिम तारीख 1 जानेवारी 2000 असली, तरी महा-मेट्रोच्या (दिवाणी न्यायालय मेट्रो) प्रकल्पाच्या अधिसूचनेच्या तारखेशी सुसंगत करण्यासाठी ती अंततः 24 डिसेंबर 2016 अशी ठरवण्यात आली. SRA सर्वेक्षण ही निवासांची संख्या आणि राहत्या घराचे कमीत कमी तीन पुरावे दाखवण्याच्या क्षमतेच्या आधारे रहिवाशांची संख्या निश्चित करण्यासाठीची गणन प्रक्रिया आहे. SRA सर्वेक्षण आणि एक पुरवणी SRA सर्वेक्षण अनुक्रमे जानेवारी व जून 2021 मध्ये प्रसिद्ध करण्यात आले.

1.1.7 1 जानेवारी 2021 च्या ज्या पत्रावर प्रवर्तक, पुणे महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (PMRDA), SRA, पुणे महानगरपालिका (PMC) पुणे विभागाचे विभागीय आयुक्त यांनी सह्या केलेल्या होत्या, त्याच्या अनुसार रहिवाशांना अधिकृतपणे, एकत्रिकृत R&R धोरणांतर्गत[4] संपूर्ण झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याच्या निर्णयाची अधिसूचना देण्यात आली (EIB प्रकल्पाच्या व्याप्तीच्या बाहेरील भागासहित), कारण प्रवर्तक, PMC व PMRDA यांना एक मल्टि-मोडल ट्रान्स्पोर्ट हब (MMI)[5], डीपी रोड आणि लाईन 3 यांच्या विकासासाठी संपूर्ण दिवाणी न्यायालय प्रदेशाची गरज होती. झोपडपट्टी भागामधील वैध सक्तीची उचलबांगडी करण्यास नोव्हेंबर 2021 मध्ये सुरुवात झाली.

---

[1] महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे संकेतस्थळ , 12 डिसेंबर 2022 रोजी वापरण्यात आले.

[2]पहिल्या वित्तीय करारावर (€200m) 22 जुलै 2019 रोजी सह्या झाल्या. दुसऱ्या वित्तीय करारावर (€200m) 07 मे 2021 रोजी सह्या झाल्या. तिसऱ्या वित्तीय करारावर (€200m) 08 डिसेंबर 2022 रोजी सह्या झाल्या.

[3] AFD प्रकल्प संकेतस्थळ, , 12 डिसेंबर 2022 रोजी वापरण्यात आले.

[4] एकत्रिकृत R&R धोरण ही विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी घेतलेल्या व SRA, PMC, PMRDA आणि प्रवर्तक यांनी मान्य केलेल्या निर्णयांची एक मालिका आहे जी दिवाणी न्यायालय विकास भागातील झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांच्या पुनर्वसनाची मानके निर्माण करते.

[5]MMI मध्ये फीडर बस सेवा आणि एक बस स्थानक, वाहनांच्या पार्किंगसाठी जागा, रस्ते आणि दिवाणी न्यायालयस्थानकासहित दोन मेट्रो लाईन्सदरम्यान एक स्कायवॉक अंतर्भूत आहे, ज्याला EIB ने निधी पुरवला आहे.

## 1.2 तक्रार

1.2.1 फेब्रुवारी 2021 मध्ये, EIB समूहाच्या तक्रार निवारण व्यवस्थेला पुण्यामधील एका व्यक्तीकडून (तक्रारदार) तक्रार मिळाली, जी प्रकल्पाच्या मंडई स्थानकाच्या बांधकामाच्या परिणामांबाबत होती[6]. ऑक्टोबर 2021 मध्ये, तक्रारदाराने कामगार पुतळा आणि राजीव गांधी नगर झोपडपट्ट्यांमधील[7] प्रकल्पबाधित लोकांच्या (PAPs) सक्तीच्या निष्कासनाविषयी स्पष्टीकरणे पुरवली जी दिवाणी न्यायालय येथे प्रकल्पाच्या मेट्रो लाईन 1 व 2 मधील इंटरचेंज स्टेशनच्या बांधकामाशी संबंधित होती. फेब्रुवारी 2022 मध्ये तक्रारदाराने EIB आणखी दस्तऐवज पुरवले, ज्यामध्ये दिवाणी न्यायालय स्थानक भागातील या दोन झोपडपट्ट्यांमधून करण्यात आलेल्या निष्कासनांच्या आरोपांच्या बाबतीत आणखी तपशील होता.

1.2.2 तक्रारदाराने सांगितले नव्हते की तक्रार गोपनीय पद्धतीने हाताळावी.

1.2.3 दिवाणी न्यायालय स्थानक भागाबाबत तक्रारदाराने आरोप केले होते की:

(i) प्रवर्तकांनी प्रकल्पासाठी लगेच आवश्यक नसलेले भाग नष्ट करून आणि SRA सोबत कोणत्याही औपचारिक कराराविना, जी दिवाणी न्यायालय भागाचे पुनर्वसन करण्यासाठी जबाबदार आहे, अतिरिक्त जमीन ताब्यात घेतली होती;

(ii) काही झोपडपट्टी रहिवासी चुकीच्या पद्धतीने पर्यायी निवासासाठी अपात्र ठरवण्यात आले;

(iii) निष्कासित झोपडपट्टी रहिवासींना अपुरी पर्यायी निवास सुविधा पुरवण्यात आली[8] व त्यांना RPF अंतर्गत मिळणे असलेल्यापैकी काही नुकसान भरपाई मिळाली नाही. त्याचप्रमाणे, झोपडपट्टी रहिवासींना पर्यायी निवासाच्या ऐवजी आर्थिक नुकसान भरपाईचा पर्याय देण्यात आला नव्हता;

(iv) काही झोपडपट्टी रहिवासींना पोलिसांच्या मदतीने जबरदस्तीने घरातून बाहेर काढण्यात आले.

1.2.4 तक्रारदाराने दावा केला की EIB ने 3 प्रवर्तकांना, PAPs ना खालील गोष्टी पुरवण्याची विनंती करावी:

(i) आधीच पुरवलेल्या घराव्यतिरिक्त एक परवडेल असे घर, अधिक चांगल्या जगण्यासाठीच्या सुविधा,आणि मुदतीची सुरक्षितता; किंवा

(ii) PAPs ना त्यांचा स्वतःचा निवास शोधता यावा यासाठी पुरेशी आर्थिक नुकसान भरपाई.

1.2.5 मार्च 2022 मध्ये तक्रार निवारण व्यवस्थेने तिचा प्रारंभिक मूल्यांकन अहवाल प्रसिद्ध केला, ज्यामध्ये या प्रकरणातील तिच्या चौकशीची व्याप्ती निश्चित करण्यात आली होती आणि दृष्टिकोन ठरवण्यात आला होता. आपल्या प्रारंभिक मूल्यांकनाच्या आधारे तक्रार निवारण व्यवस्थेने वरील आरोप आणि दाव्यांबाबत एक अनुपालन आढावा करणे योग्य समजले.

## 1.3 पार पाडलेले काम

1.3.1 अनुपालन आढाव्या दरम्यान आणि तक्रारदाराच्या आरोपांच्या आधारे तक्रार निवारण व्यवस्थेने प्रकल्पाला लागू असलेल्या EIB पर्यावरणीय आणि सामाजिक मानकांची (EIB E&S Standards) पडताळणी केली, आणि हे ठरवले की प्रकल्पाच्या EIB E&S मानकांचे मूल्यांकन व देखरेख करून EIB स्वतःची धोरणे, कार्यपद्धती आणि मानके यांचे अनुपालन करते का.

1.3.2 तक्रार निवारण व्यवस्थेने प्रकल्पाच्या सामाजिक दस्तऐवजांची पडताळणी केली, ज्यात पर्यावरणीय व सामाजिक परिणाम मूल्यांकन (ESIA), RPF, RAP, EIB E&S मानके, भारताचे राष्ट्रीय व महाराष्ट्राचे राज्य कायदे, तसेच प्रकल्पाच्या निधी पुरवठ्याशी निगडित सर्व संबंधित करार व निर्णय समाविष्ट होते.

1.3.3 तसेच तक्रार निवारण व्यवस्थेने अतिरिक्त माहिती गोळा करण्यासाठी EIB सेवा, प्रवर्तक, तक्रारदार व तक्रारदाराने शोधलेले PAPs यांच्याशीही संपर्क साधला. EIB-CM ने अनुपालन आढाव्या दरम्यान गोळा

---

[6] कृपया लक्षात घ्या की मंडई मेट्रो स्टेशन (याच प्रकल्पातील) आरोप एका विवाद निराकरण प्रक्रियेद्वारे हाताळण्यात आले, आणि ते या अहवालात समाविष्ट नाहीत. तक्रारीचा एक भाग म्हणून असलेले लाचखोरीचे आरोप महानिरीक्षकाच्या EIB फसवणूक अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले.

[7] झोपडपट्ट्या विकास योजना 2007 – 2027 च्या मसुद्यामध्ये दर्शवल्या आहेत; येथे (2013), येथे आणि येथे (बांधकाम परवाने), आणि येथे (2018) उपलब्ध, सर्व 12 डिसेंबर 2022 मध्ये वापरण्यात आले. विकास योजना दर्शवतात की दिवाणी न्यायालय येथील झोपडपट्ट्यांनी प्लॉट 806 व 806A, तसेच मुठा नदी व प्लॉट क्र.807, 808, 810 व 811 यांच्यामधील जागा व्यापली होती.

[8] इतर गोष्टींबरोबरच वीज नाही, पुरेसा पाणी पुरवठा (खराब दर्जा) नाही, शाळांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य सोय नाही, सरकारी मोफत वैद्यकीय निगा उपलब्ध नाही, कामाच्या ठिकाणापर्यंत पोहोचण्यासाठी लांब अंतराचा प्रवास.

झालेल्या दस्तऐवजी पुराव्याचे विश्लेषण केले. आढावा घेतलेल्या अनेक दस्तऐवजांचे मराठीमधून इंग्रजीमध्ये अनुवाद करण्यात आले होते.

1.3.4 आपल्या अनुपालन आढाव्याच्या आधारे तक्रार निवारण व्यवस्थेने हा निष्कर्ष अहवाल तयार केला.

1.3.5 प्रकल्पाने EIB E&S मानकांचे अनुपालन न केल्याचे आरोप व संबंधित उप-आरोप सारणी 1 मध्ये सूचिबद्ध केले आहेत.

*सारणी 1 आरोप व उप-आरोपांचा गोषवारा*

| आरोप | उप-आरोप |
|---|---|
| प्रवर्तकांनी SRA शी औपचारिक करार न करता अतिरिक्त जमीन ताब्यात घेतली | NA (1) |
| भरपाईसाठी अपात्रता | 2.1) पात्रता निकष<br>2.2) हक्कांचे एकक<br>2.3) अंतिम तारीख<br>2.4) निवासाचा पुरावा |
| अपुरी भरपाई | 3.1) बदली निवासांच्या वाटपात असुरक्षित PAPs चा विचार<br>3.2) बदली निवासांमधील दोष<br>3.3) PAPs च्या प्रवास खर्चाचा समावेश<br>3.4) शिक्षणाची उपलब्धता |
| EIB ला पूर्वसूचना न देता सक्तीची उचलबांगडी | NA (4) |

1.3.6 मूल्यांकन आणि देखरेखीच्या वेळी EIB ला लागू असलेल्या E&S धोरणे व कार्यपद्धतींच्या (विभाग 2.3 पहा) तुलनेत EIB च्या अनुपालनाचे आढावा घेण्यात आले. तक्रार निवारण व्यवस्थेला काही समस्या, आणि उप-समस्या आढळल्या, ज्या सारणी 2 मध्ये सूचिबद्ध आहेत.

*सारणी 2 समस्या व उप-समस्यांचा गोषवारा*

| समस्या | उप-समस्या |
|---|---|
| प्रकल्पाच्या सामाजिक परिणामाचे मूल्यांकन | 1.1) प्रवर्तकांची सामाजिक क्षमता<br>1.2) पुनर्वसनाचा संस्थात्मक आराखडा |
| प्रकल्पाच्या सामाजिक परिणामाचे संनियंत्रण | 2.1) प्रवर्तकांची सामाजिक क्षमता<br>2.2) दिवाणी न्यायालय स्थानकावरील सामाजिक परिणाम |

# 2 नियामक आराखडा

## 2.1 EIB सामूहिक तक्रार निवारण व्यवस्था (European Investment Bank — Complaints Mechanism)

2.1.1 तक्रार निवारण धोरण[9] हे तक्रार निवारण व्यवस्थेवर, EIB कडून झालेल्या अभिकथित कुप्रशासनाशी संबंधित तक्रारी हाताळण्याचे काम सोपवते[10]. कुप्रशासन म्हणजे सदोष किंवा अयशस्वी प्रशासन; EIB जेव्हा लागू कायदे आणि/किंवा सुस्थापित धोरणे, मानके आणि कार्यपद्धती यांच्या अनुसार काम करत नाही तेव्हा असे होते[11]. तसेच कुप्रशासनाचा संबंध EIB च्या कार्यांच्या पर्यावरणीय किंवा सामाजिक परिणामांशीही संबंधित असू शकतो[12].

[9] EIB समूह तक्रार निवारण व्यवस्था धोरण येथे उपलब्ध, 12 डिसेंबर 2022 रोजी वापरले.
[10] तक्रार निवारण व्यवस्था धोरणाचे § 5.1.3.
[11] § 3.1, Ibid.
[12] § 3.3, Ibid.

2.1.2 धोरण स्पष्ट सांगते की तक्रार निवारण व्यवस्था EIB च्या कामांचा आढावा, EIB वर जबाबदारी असलेले गैरकारभार झाले आहे का, यासाठी करते. तक्रार निवारण व्यवस्था करत असलेल्या या आढाव्या मध्ये, विशेषतः E&S परिणामांबद्दलच्या तक्रारी असल्यास प्रकल्पाने केलेल्या मानकांच्या अनुपालनाचा वस्तुनिष्ठ आढावा असू शकतो[13].

2.1.3 तक्रार निवारण व्यवस्था ही आंतरराष्ट्रीय संस्था, सामाजिक संस्था, राष्ट्रीय, प्रादेशिक किंवा स्थानिक अधिकाऱ्यांशी संबंधित तक्रारींचे अन्वेषण करण्यासाठी सक्षम नाही[14].

## 2.2 प्रकल्पाला लागू मानके

2.2.1 EIB चे 2009 चे पर्यावरणीय व सामाजिक तत्त्वे आणि मानके यांचे विधान (स्टेटमेंट)[15] आणि EIB ची 2018 ची EIB E&S मानके[16] प्रकल्पाला लागू आहेत. प्रकल्पांनी संबंधित आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कायद्याचे पालन करावे हे असले[17], तरी EIB E&S मानके कायदेशीर आवश्यकतांच्या पलिकडे जाऊ शकतात[18].

2.2.2 EIB E&S मानकांमध्ये पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम आणि धोक्यांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन[19]; इच्छेविरुद्ध पुनर्वसन[20]; असुरक्षित गटांचे हक्क व हितसंबंध[21]; आणि स्टेकहोल्डर्सची कामे यांचा समावेश होतो[22]. त्यामुळे, उदाहरणार्थ, EIB E&S मानकांमध्ये ESIA[23], RPF/RAP साठीच्या आवश्यकता, आणि इच्छेविरुद्ध पुनर्वसनाशी संबंधित भरपाईसाठीच्या प्रक्रिया, कार्यपद्धती, आणि निकष[24],असुरक्षित गटांसाठीच्या विशेष विचारांसाठीच्या आवश्यकता[25], आणि पुनर्वसन प्रक्रियेमधील स्टेकहोल्डर्सची कार्ये समाविष्ट आहेत[26].

2.2.3 प्रकल्प हा राष्ट्रीय कायद्यांनुसार असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय व राज्यातील कायद्यांचे वेगवेगळे भाग हे जमीन ताब्यात घेणे, पुनर्वसन, नुकसान भरपाई आणि असुरक्षित गट यांच्याशी संबंधित आहेत. त्यांच्यामध्ये 2013 चा जमिनीचे अधिग्रहण व पुनःस्थापन आणि पुनर्वसनामधील यथायोग्य नुकसानभरपाई व पारदर्शकता यांसाठीचा हक्क कायदा (LARR Act) समाविष्ट आहे[27], व त्यालाच समर्थन देणारे 2014 चे महाराष्ट्र LARR नियम आहेत[28]. तसेच LARR कायद्यामध्ये अतिरिक्त उपायांची तरतूद आहे, जेथे प्रकल्पग्रस्त परिवार (PAFs) हे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या (SC/STs) व्याख्येत बसतात[29]. जेथे झोपडपट्ट्या बाधित होतात, तेथे 1956 चा झोपडपट्टी भाग (सुधारणा व निष्कासन) कायदा[30] आणि 1971 चा महाराष्ट्र झोपडपट्टी भाग (सुधारणा, निष्कासन व पुनर्विकास) कायदा[31] यांचा संबंध आहे.

## 2.3 EIB च्या जबाबदाऱ्या

[13] § 5.3.3, Ibid.
[14] § 4.3.2, Ibid.
[15] §4, स्टेटमेंट, येथे उपलब्ध. 13 डिसेंबर 2022 रोजी वापरले.
[16] 2018 EIB E&S मानके, येथे उपलब्ध, 13 डिसेंबर 2022 रोजी वापरले. § 3 – पार्श्वभूमी, स्टेटमेंट.
[17] 2013 च्या EIB पर्यावरणीय आणि सामाजिक रीती आणि कार्यपद्धती हँडबुक (हँडबुक) मधील B1.5 §63 येथे उपलब्ध, 13 डिसेंबर 2021 रोजी वापरले.
[18] §6, स्टेटमेंट.
[19] EIB E&S मानके, मानक 1.
[20] EIB E&S मानके, मानक 6.
[21] EIB E&S मानके, मानक 7.
[22] EIB E&S मानके, मानक 10.
[23] EIB E&S मानके, मानक 1.
[24] EIB E&S मानके, मानक 6.
[25] EIB E&S मानके, मानक 7.
[26] EIB E&S मानके, मानक 1, 6 आणि 10.
[27] §2 (b)(i), 2013 चा कायदा क्र. 30, भारतीय जमिनीचे अधिग्रहण व पुनःस्थापन आणि पुनर्वसनामधील यथायोग्य नुकसानभरपाई व पारदर्शकता यांसाठीचा हक्क कायदा (LARR कायदा). कायदा व त्यातील सुधारणा येथे उपलब्ध आहेत. 14 डिसेंबर 2022 रोजी वापरले.
[28] 2014 चे महाराष्ट्र LARR नियम येथे उपलब्ध. 14 डिसेंबर 2022 रोजी वापरले.
[29] §41 (11), LARR कायदा.
[30] 1956 चा कायदा क्र. 96, झोपडपट्टी भाग (सुधारणा व निष्कासन) कायदा, येथे उपलब्ध. 14 डिसेंबर 2022 रोजी वापरले.
[31] 1971 चा कायदा क्र. 28, महाराष्ट्र झोपडपट्टी भाग (सुधारणा, निष्कासन व पुनर्विकास) कायदा, येथे उपलब्ध. 14 डिसेंबर 2022 रोजी वापरले.

2.3.1 प्रकल्पाला लागू असलेल्या EIB E&S मानकांच्या अनुपालनाची जबाबदारी प्रवर्तकांवर असली (विभाग 2.2 पहा), तरी जे प्रकल्प लागू असलेली EIB E&S मानके पूर्ण करत नाहीत, त्यांना EIB निधी पुरवणार नाही[32]. त्यामुळे EIB ची बहुतांश भूमिका ही प्रवर्तकांनी लागू असलेली EIB E&S मानके पूर्ण केल्याची खात्री करणे, आणि पडताळणी करणे, की प्रकल्पाची अंमलबजावणी तिच्या निधी पुरवठ्याशी जोडलेल्या अटींनुसार (यात लागू असलेली EIB E&S मानके) केली जात आहे[33]. त्यामुळे EIB चे सामाजिक मूल्यांकन ही एकदाच होणारी कृती नसून ती सतत चालू असणारी, पुनरावर्तने होणारी प्रक्रिया आहे, जी संपूर्ण प्रकल्पाच्या मुदतीदरम्यान चालू राहते[34].

2.3.2 इतर गोष्टींबरोबर स्टेटमेंटमध्ये अधोरेखित करण्यात आले आहे, की EIB च्या प्रकल्पाशी संबंधित कार्यांमध्ये, विशेषतः युरोपियन समुदायाबाहेर काम करताना सामाजिक विचार महत्त्वाची भूमिका बजावतात. यासाठी EIB मानवी हक्कांवर आधारित दृष्टिकोन ठेवेल आणि ज्या प्रकल्पांमध्ये शेवटी लक्षणीय सामाजिक नुकसान राहते, अशा प्रकल्पांना निधी पुरवणार नाही[35]. तसेच प्रवर्तकांकडे EIB च्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी पुरेशी क्षमता आहे का, याचे मूल्यमापनही EIB करेल[36].

2.3.3 हँडबुक[37] हे स्टेटमेंटचे रूपांतर EIB च्या जबाबदाऱ्या व भूमिकांमध्ये करते.

2.3.4 EIB ने निधी पुरवलेले सर्व गुंतवणूक प्रकल्प हे योग्य प्रकारे मोजणी केलेल्या सामाजिक मूल्यांकनाच्या आधीन असतील[38]. मूल्यांकनाचा एक भाग म्हणून EIB च्या सक्षम सेवा बारकाईने योग्य ती सामाजिक पडताळणी करतील[39] ज्यात प्रवर्तक व संबंधित राष्ट्रीय संस्थांच्या क्षमतेचे मूल्यांकन[40], सध्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर, नियामक आणि संस्थात्मक आराखड्याचे मूल्यांकन, तसेच सादर केलेल्या दस्तऐवजांची पडताळणी समाविष्ट असेल[41].

2.3.5 जर प्रकल्प आणि/किंवा त्याच्याशी जोडलेल्या सुविधांसाठी इच्छेविरुद्ध पुनर्वसन आणि परिणामांना बळी पडणारे गट आवश्यक असले, तर EIB च्या सक्षम सेवा या प्रवर्तकांच्या सल्ल्याने आणि EIB E&S मानके 6 व 7 यांच्याशी सुसंगत पद्धतीने, या बाबतीत स्वीकारण्याचा दृष्टिकोन, अंमलबजावणी आणि संनियंत्रण व्यवस्था ठरवतील[42]. इच्छेविरुद्ध पुनर्वसनाबाबतचे संबंधित करार EIB च्या प्रकल्पाच्या दस्तऐवजांमध्ये स्पष्टपणे नोंदवले जावे[43].

2.3.6 बारकाईने करण्याची सामाजिक पडताळणी E&S डेटा शीटमध्ये (ESDS) नोंदवली जाईल व त्यामध्ये इतर गोष्टींबरोबरच EIB चे सामाजिक धोके व परिणाम यांचे मूल्यांकन आणि प्रस्तावित धोके कमी करणे, सादर केले जाईल, यात संबंधित अटी आणि प्रगती अहवालाबाबतच्या आवश्यकताही असतील. वित्तीय करारामध्ये

---

[32] § 6, स्टेटमेंट

[33] §255, हँडबुक.

[34] हँडबुक चे §30 हे यावर जोर देते, की ओळखणे, मूल्यांकन, अंमलबजावणी व देखरेख यांच्या दरम्यान सामाजिक समस्या विचारात घेतल्या जाव्या. EIB च्या प्रकल्प चक्राबाबत अधिक माहिती येथे उपलब्ध आहे (14 डिसेंबर 2022 रोजी वापरली).

[35] §§ 30 आणि 49, स्टेटमेंट.

[36] § 12 – पार्श्वभूमी, Ibid. तसेच स्टेटमेंटचे §§ 3 व 15, आणि सर्वसाधारण पार्श्वभूमीविषयक टीप चे §7 पहा – सामाजिक मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक टीप.

[37] V2013 च्या हँडबुकचा खंड 1 हा बँकेने करण्याच्या या प्रकल्पाच्या मूल्यांकन आणि संनिरीक्षणाशी संबंधित आहे, तसेच हेही पहा:

[38] §§ 29 आणि 34, हँडबुक.

[39] हँडबुकच्या § 123 च्या अनुसार किमान पातळीवर, EIB च्या सामाजिक मूल्यांकनामध्ये EIB ची E&S मानके 6 ते 10 यामध्ये दिलेल्या मूलभूत समस्यांचे मूल्यांकन असेल, आणि प्रकल्पाचा/कार्याचा प्रकार आणि संदर्भ याच्या अनुसार शासन व क्षमतेशी संबंधित समस्या, चिघळलेल्या असमानता, आणि गुंतागुंतीचे संस्थात्मक वातावरण आणि सामाजिक प्रवृत्तींचे मूल्यांकन असेल. हँडबुकच्या §§ 90 व 219 मध्ये म्हटले आहे, की EIB च्या सक्षम सेवा एका अंतराचे विश्लेषणाच्या मदतीने EIB मानकांशी न जुळणाऱ्या प्रकल्पाच्या भागांचे मूल्यांकन करेल आणि SMP योग्य ते सामाजिक परिणाम कमी करणारे उपाय आहेत का, जे लक्षात आलेल्या सर्व अंतरे व अनुपालन न केलेल्या गोष्टींची दखल घेतील, याची पडताळणी करेल.

[40] हँडबुकच्या §§ 90 व 213-215 मध्ये स्पष्ट केले आहे की क्षमतेचे मूल्यांकन हे आवश्यकतेनुसार प्रवर्तकांची निश्चित केलेल्या परिणामांचे व्यवस्थापन करण्याची आणि परिणाम कमी करण्यासाठीचे उपाय ठरवण्यासाठीची बांधिलकी व क्षमता याकडे लक्ष केंद्रित करेल; तसेच हे मूल्यांकन प्रवर्तकांच्या सामाजिक व्यवस्थापन व्यवस्थेची गुणवत्ता आणि पर्याप्तता यांचेही मूल्यांकन करेल. याशिवाय सध्याच्या संस्थात्मक आराखड्याची क्षमता व सामाजिक समस्या (यात संबंधित राष्ट्रीय संस्थांची SMP चे लागू उपाय अमलात आणण्याची व त्यांची देखरेख करण्याची क्षमता सुद्धा समाविष्ट आहे) हाताळण्याच्या व्यवस्थेचेही मूल्यांकन केले जाईल. EIB चे मूल्यांकन हे प्रवर्तक व इतर विश्वासू स्रोतांकडून मिळवलेल्या माहितीवर आधारित असेल व त्याचा माग दीर्घ कालावधीत ठेवला जाईल.

[41] §90, Ibid. यामध्ये आवश्यक असल्यास सामाजिक-आर्थिक आधाररेषा व मूल्यांकन, स्टेकहोल्डर्सचे विश्लेषण व स्टेकहोल्डर्सना काम देण्याची योजना, SMP आणि इतर करार समाविष्ट असतील जसे सामाजिक कृती योजना. तसेच EIB च्या सक्षम सेवा सामाजिक मूल्यांकनाची शोधने ही जोखमीचे मूल्यांकन आणि ते कमी करणे, खर्च-लाभ विश्लेषण, प्रकल्पाची रचना व खर्चाची आकडेमोड आणि प्रकल्पाची अंमलबजावणी व प्रचालन यादरम्यान विचारात घेतली आहेत का याची पडताळणी करतील.

[42] §§ 125 आणि 134, Ibid.

[43] §125, Ibid.

सर्व संबंधित व्याख्या, कलमे आणि EIB मानकांचे प्रवर्तकांनी अनुपालन केल्याची खात्री करण्यासाठी रिपोर्ट करण्यासाठीच्या आवश्यकता अंतर्भूत असतील[44].

2.3.7 EIB च्या संनियंत्रणाचा उद्देश हा EIB च्या जबाबदाऱ्या पूर्ण करणे व तिची उद्दिष्टे पूर्ण करणे यासाठी आवश्यक असेल त्यानुसार EIB च्या मान्यताविषयक अटी आणि संनियंत्रण योजना यांचे प्रकल्पामध्ये अनुपालन केले जात आहे याची खात्री करणे, आणि संपूर्ण प्रकल्पाच्या जीवनचक्रामध्ये अपेक्षित उत्पादने आणि परिणाम प्रत्यक्षात पोहोचवले जात आहेत याची पडताळणी करणे[45]. जोपर्यंत सामाजिक व्यवस्थापन योजनेमध्ये (SMP) तपशील दिल्यानुसार धोके कमी करण्याचे आणि नुकसान भरपाईचे सर्व उपाय अमलात आणले जात नाहीत तो पर्यंत EIB चे संनियंत्रण चालू राहील[46].

2.3.8 EIB ही प्रवर्तकांनी दिलेले रिपोर्ट्स, साईटला दिलेल्या भेटी तसेच स्थानिक समाजामधून मिळालेली माहिती इ. च्या आधाराने प्रकल्पांचे देखरेख करतो[47]. कराराचा भंग आणि/किंवा इतर बाबतींमध्ये प्रकल्पाची खराब कामगिरी यासाठी संबंधित कर्जदार आणि/किंवा प्रवर्तक (लागू असेल तसे) यांनी, EIB च्या मान्यतेनुसार दुरुस्तीसाठी कृती करणे आवश्यक होऊ शकते. कर्जदाराने आणि/किंवा प्रवर्तकाने अशा कृतीबद्दल आणि योग्य ती पावले उचलण्याबद्दल EIB सह सहमत न होण्यामुळे, EIB सह केलेल्या संबंधित वित्तीय दस्तऐवजांच्या अनुसार संबंधित कर्जदारासाठी आर्थिक आणि कायदेविषयक परिणाम होऊ शकतात[48].

# 3 शोध-परिणाम व निष्कर्ष

## 3.1 प्रकल्पाला लागू असलेल्या मानकांचे प्रकल्पाकडून अनुपालन

3.1.1 आपल्या चौकशीचा भाग म्हणून जमवलेल्या माहितीच्या आधारे तक्रार निवारण व्यवस्था असे शोधून काढते की EIB E&S मानकांच्या प्रकल्पामध्ये केलेल्या अनुपालनाच्या बाबतीत:

- प्रवर्तकांनी SRA सोबत औपचारिक करार न करताच अतिरिक्त जमीन ताब्यात घेतल्याचा आरोप निराधार आहे, कारण ही गोष्ट एका बंधनकारक आदेशामुळे झाली आणि पुनर्वसन प्रक्रियेला SRA ने सहमती दिली होती आणि पुनर्वसन आराखड्याला एकत्रिकृत R&R धोरणामध्ये औपचारिक रूप देण्यात आले होते.

- बाकीच्या तीन आरोपांच्या बाबतीत तक्रार निवारण व्यवस्थेच्या लक्षात आले की (i) PAPs ची नुकसान भरपाईसाठीची पात्रता आणि (ii) एकत्रिकृत R&R धोरणाच्या आधारे अपुरी नुकसान भरपाई, तसेच (iii) EIB ला सक्तीच्या निष्कासनांबाबत पूर्वसूचना न देणे या गोष्टी EIB E&S मानकांचे अनुपालन करत नाहीत. मात्र EIB च्या भूमिकेच्या संदर्भात त्यांचे मूल्यमापन निराधार असे करण्यात आले आहे, कारण RAP च्या जागी एकत्रिकृत R&R धोरण आले आणि उचलबांगडी, ज्यांच्या बाबतीत EIB ला वेळेवर कळवण्यात आले नाही, त्यामुळे ही गोष्ट घडली.

3.1.2 दरम्यानच्या काळात या त्रुटींबाबत कारवाई करण्यासाठी EIB ने प्रवर्तकांशी संपर्क साधला आहे, ज्यांच्यापैकी काही अधिक चिंताजनक आहेत, कारण सक्तीच्या उचलबांगडीनंतर बराच काळ लोटला आहे, आणि उदरनिर्वाहाच्या पुनःस्थापनेमध्येही विलंब झाला आहे (विशेषतः बदली निवासांच्या मानकांच्या बाबतीत किंवा असुरक्षित PAPs अधिक परिणाम झाले आहेत). वरील विवेचनाच्या आधारे तसेच या अहवालाचा विभाग 3.2 मध्ये दिलेल्या शोध-परिणामांच्या आधारे, तक्रार निवारण व्यवस्था सुधारणेसाठी सूचना लागू करते (या अहवालाचा विभाग 4 पहा).

## 3.2 लागू असलेल्या नियामक आराखड्यासंबंधी EIB चे अनुपालन

3.2.1 पुढील परिच्छेदांमध्ये तक्रार निवारण व्यवस्थेने केलेले EIB ने तिच्या धोरणांच्या व कार्यपद्धतींच्या विरोधात केलेल्या कार्यचालनाचे (i) मूल्यांकन व (ii) देखरेख थोडक्यात दिले आहे.

---

44 §90, Ibid.
45 §270, Ibid.
46 §275, Ibid.
47 स्टेटमेंटचे §8.
48 §9 Ibid.

*प्रकल्पाचे मूल्यांकन*

3.2.2 तक्रार निवारण व्यवस्थेने एका बाजूला EIB ने केलेले प्रवर्तकांच्या सामाजिक व्यवस्थापन क्षमतेचे मूल्यांकन, तर दुसऱ्या बाजूला सध्या अस्तित्वात असलेला संस्थात्मक आराखडा आणि संबंधित राष्ट्रीय संस्था यांचे मूल्यांकन केले.

3.2.3 तक्रार निवारण व्यवस्थेला आढळले की EIB च्या मूल्यांकनामध्ये प्रवर्तकांच्या सामाजिक व्यवस्थापन क्षमतेशी संबंधित धोके विचारात घेतले गेले; यासाठी प्रकल्पाच्या अंमलबजावणी टीममध्ये पर्यावरणविषयक आणि सामाजिक तज्ज्ञ उपलब्ध असले तरच निधी वितरण केले जाईल अशी अट घालण्यात आली.

3.2.4 तक्रार निवारण व्यवस्थेला आढळले की EIB च्या मूल्यांकनात संस्थात्मक आराखडा आणि प्रवर्तकांसहित संबंधित संस्थांमधील सामाईक केलेल्या, त्रस्त झोपडपट्टी भागांच्या पुनर्वसनाबद्दलच्या जबाबदाऱ्या यांचे मूल्यांकन दिसले नाही, आणि असेही आढळले की RPF/RAP ची यशस्वी अंमलबजावणी ही SRA व इतर स्थानिक अधिकाऱ्यांच्या सहभागावर अवलंबून होती.

3.2.5 या समस्येवर EIB ने संनियंत्रण टप्प्यामध्ये 2022 चे गॅप मूल्यांकन व 2023 चे LRF यांच्या मार्फत उपाय योजना केली, पण तक्रार निवारण व्यवस्था एक शिफारस जारी करते, जी लागू संस्थात्मक आराखडा आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहभागी असलेल्या राष्ट्रीय/स्थानिक संस्थांची क्षमता यांचे मूल्यांकन पुढे जाण्यास मदत म्हणून आहे.

*प्रकल्पाची देखरेख*

3.2.6 वित्तीय करारांनुसार (पहा परिच्छेव्द 1.1.3), निधीची वितरणे ही प्रवर्तकांकडे कौशल्ये आणि संदर्भाच्या शर्तींसह पुरेसे स्त्रोत आहेत आणि प्रकल्प अंमलबजावणी टीममध्ये पर्यावरण आणि समाज याविषयीचे तज्ज्ञ आहेत, जे पर्यावरण व्यवस्थापन योजना आणि पुनर्वसन कृती योजना यांची अंमलबजावणी करतील अशा पुराव्याच्या प्राप्तीवर अवलंबून असतात. EIB ने डिसेंबर 2020 आणि सप्टेंबर 2021 मध्ये निधी वितरण केले, त्यामुळे तक्रार निवारण व्यवस्थेने त्यावेळी उपलब्ध माहितीचा आढावा घेतला. तक्रार निवारण व्यवस्थेला प्रकल्प अंमलबजावणी टीममध्ये व्यावसायिक सामाजिक तज्ज्ञ अंतर्भूत असल्याचा काहीही पुरावा मिळाला नाही. मात्र प्रवर्तकांनी EIB ला, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी पर्यावरण व समाज दोन्ही विषयांचे तज्ज्ञ तसेच पुरेशी संसाधने असल्याचे प्रमाणित करणारा एक दस्तऐवज दिला. तसेच कर्मचारी RAP च्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करून रिपोर्टिंग करत असल्याचा पुरावा आहे, जो कर्जदात्यांना त्या वेळी समाधानकारक दर्जाचा असल्याचे वाटले. सामाजिक बाबीचा समावेश करत असलेल्या जनरल कन्सल्टंट्सच्या वेळी एक पर्यावरण तज्ज्ञही उपस्थित होता. जेव्हा EIB ला दिवाणी न्यायालयस्थानकावरील घटनांबद्दल समजले (2022 मध्ये), तेव्हा तिने 2023 मध्ये जनरल कन्सल्टंट्सच्या मार्फत आणि सेंटर फॉर यूथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टिव्हिटीज च्या (CYDA) आणि LRP सल्लागार यांच्या तात्पुरत्या नेमणुका करून सामाजिक तज्ज्ञ पाठवले (परिच्छेद 1.1.5 सुद्धा पहा). या बाबतीत तक्रार निवारण व्यवस्था एक सूचना पाठवते.

3.2.7 जुलै 2021 मध्ये, EIB सेवांनी प्रकल्पाच्या सह-कर्जदात्यासह एक संयुक्त व्हर्चुअल अधीक्षण मोहीम राबवली. सप्टेंबर 2021 मध्ये सामाईक RAP प्रगती अहवालांमुळे, दिवाणी न्यायालयस्थानकाच्या जमीन नियोजनामुळे PAPs मध्ये महत्त्वाची भर पडल्याचे लक्षात आले. त्यामुळे EIB सेवांनी प्रवर्तकांना विनंती केली की त्यांनी या बदलांचा तपशील पाठवावा, त्यानुसार RAP अद्यतनित करावे अंतिम तारीख स्पष्ट करावी, ज्यामुळे RAP अंतर्गत झोपडपट्टी निवासींची पात्रता ठरते.

3.2.8 सप्टेंबर 2021 मध्ये EIB ने प्रकल्पासाठीच्या कर्जाचा एक भाग वितरित केला. त्या वेळी प्रवर्तकांनी कळवले:

(i) प्रवर्तकांच्या जबाबदारीच्या अंतर्गत असलेल्या दिवाणी न्यायालययेथील PAFs (234 वरून 683) आणि PAPs (995 वरून 3 415) मध्ये लक्षणीय वाढ.

(ii) नुकसान भरपाईसाठी झोपडपट्टी निवासींची पात्रता ठरवण्यासाठी एका सर्वेक्षणामध्ये SRA चा सहभाग, आणि

(iii) एक अंतिम तारीख लागू करणे (24 डिसेंबर 2016) ज्यामुळे काही PAPs आपोआपच अपात्र झाले किंवा त्यांना पात्रता सिद्ध करण्यासाठी सांगितलेले कागदपत्र पुरवणे आव्हानात्मक झाले.

3.2.9 या माहितीमध्ये हे सांगण्यात आले नव्हते की EIB ने मान्य केलेल्या RAP च्या जागी प्रत्यक्षात एकत्रिकृत R&R धोरण आले होते. निधी वितरण अशा गृहितकावर करण्यात आले, की EIB सेवा ही पुढील निधी वितरणे आणि सह्या मान्य करण्यासाठी अटी म्हणून प्रवर्तकांशी मान्य केलेल्या कृतींच्या प्रगतीचे मूल्यमापन निरंतर करत राहील. विशेषतः वितरणांच्या वेळी EIB स्वतः होऊन देखरेख करू शकली असती, प्रकल्पाच्या अनुपालनाची पडताळणी करू शकली असती[49]. तथापि, RAP मधील बदल आणि आगामी सक्तीच्या उचलबांगडीच्या कृती बँकेला कळवण्याची जबाबदारी प्रवर्तकांची आहे. COVID च्या वैश्विक महामारीमुळे आलेल्या प्रवासांवरील मर्यादांमुळे साईटवर भेटी देणे, प्रत्यक्ष जागी तपासण्या करणे, आणि अनेक स्टेकहोल्डर्सच्या साठी तपासण्या करणे हेसुद्धा विचारात घेतले पाहिजे. त्यामुळे तक्रार निवारण व्यवस्था निष्कर्ष काढते की बँकेकडून कोणतेही कुप्रशासन झाले नाही, पण संनियंत्रण मध्ये सुधारणा करण्यासाठी उदरनिर्वाहाचे पुनर्स्थापन करण्याच्या उपायांचे साहाय्य म्हणून एक सूचना पाठवते.

3.2.10 2021 च्या चौथ्या तिमाहीमध्ये प्रवर्तकांनी EIB का कळवले की विकासासाठी सपूर्ण दिवाणी न्यायालयाचा भाग आवश्यक असून संपूर्ण झोपडपट्टीचे पुनर्वसन एकाच वेळी केले जाईल. एकत्रिकृत R&R धोरण (EIB ने मान्य केलेल्या 2019 च्या RAP ला प्रतिस्थापित करणारे), राबवण्याचा निर्णय, जो रहिवाशांना 1 जानेवारी 2021 रोजी कळवण्यात आला होता, तो EIB च्या विनंतीवरून उशिरा, जानेवारी 2022 च्या शेवटच्या दिवसांमध्ये सामाईक करण्यात आला.

3.2.11 मल्टि-मोडल ट्रान्स्पोर्ट हब (MMI) चे जे भाग इच्छेविरुद्ध पुनर्वसनाला कारणीभूत ठरतात, ज्याचे स्थान हे EIB च्या मूल्यांकनानंतर भारतीय अधिकाऱ्यांनी ठरवले, ते EIB च्या संबंधित सुविधेच्या व्याख्येत बसत नाहीत[50]. किंबहुना, या भागांची व्यवहार्यता ते केवळ अवलंबून नाहीत आणि EIB ने निधी पुरवलेल्या दिवाणी न्यायालय स्थानकाच्या यशस्वी प्रचालनासाठी अत्यावश्यक नाहीत. तक्रार निवारण व्यवस्थेला समजते की 2023 LRF मध्ये प्रवर्तकांच्या आर्थिक जबाबदारीमध्ये असलेले सर्व PAFs येतात, यात प्रकल्पामुळे (दिवाणी न्यायालय स्थानक, EIB E&S मानकांशी सुसंगत) निष्कासित तसेच इतर विकासामुळे बाधित असलेलेही येतात (MMI आणि रस्ता, EIB E&S मानकांच्या पलिकडे).

3.2.12 तक्रार निवारण व्यवस्थेने लक्षात घेतले आहे की दिवाणी न्यायालय झोपडपट्टीमधील (परिच्छेद 1.2.1 पहा), सक्तीच्या निष्कासनांच्या आरोपांची माहिती तिने सामाईक करताच EIB सक्षम सेवांनी सामाजिक तज्ज्ञांना त्या ठिकाणी आणून त्यांचे देखरेखीचे काम अधिक तीव्र केले, ते पुढील गोष्टींची दखल घेण्यासाठी: (i) प्रकल्पाच्या सामाजिक परिणामांच्या माहितीमधील अंतरे, आणि (ii) दिवाणी न्यायालय पुनर्वसन EIB E&S मानकांनुसार करण्याबाबतच्या EIB च्या चिंता. याच संदर्भात EIB ने, दिवाणी न्यायालयाच्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाच्या बाबतीत 2019 RAP आणि EIB मानकांच्या संदर्भात एक अंतर (गॅप) मूल्यांकन सुरू केले, जे फेब्रुवारी 2022 मध्ये पूर्ण झाले.

3.2.13 एप्रिल 2022 मध्ये, EIB ला दिसले की ने EIB E&S मानकांच्या अनुसार दिवाणी न्यायालय झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी – जितके शक्य तितके – उदरनिर्वाहाची पुनःस्थापना करण्यासाठी एक उदरनिर्वाह पुनःस्थापना कार्यक्रम (LRP) विकसित करून अमलात आणणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे. प्रवर्तकांच्या वतीने CYDA ने केलेल्या उदरनिर्वाह आधाररेषा सर्वेक्षणाचा (LBS) भाग म्हणून जमवलेल्या सामाजिक-आर्थिक डेटाच्या आधारे, मार्च 2023 एका EIB सल्लागाराने LRP चा अग्रदूत म्हणून एक उदरनिर्वाह पुनःस्थापना आराखडा (LRF) तयार केला. LRF चा उद्देश हा, एका बाजूला 2019 RAP व EIB E&S मानके, आणि दुसऱ्या बाजूला एकत्रिकृत R&R धोरण यांच्यामधील अंतरे, जी EIB ने प्रकल्पाच्या देखरेखीचा एक भाग म्हणून शोधली होती, त्ती कशी भरून काढायची यासाठी पर्याय आणि मार्गदर्शन पुरवणे हा होता.

3.2.14 LRF म्हणजे दिवाणी न्यायालय भागाच्या पुनर्वसनामधील PAPs चे उदरनिर्वाह पुनःस्थापित करण्यामधील वाईट परिणाम आणि बांधिलकी यांच्या लक्षणीय प्रगतीचे द्योतक आहे. आणखी एक सकारात्मक गोष्ट म्हणजे ते इतर विकासालाही लागू होतील, जे प्रकल्पाशी संबंधित नाहीत पण अधिकाऱ्यांनी ते प्रवर्तकांच्या आर्थिक जबाबदातीमध्ये अंतर्भूत असल्याचे ठरवले आहे. तथापि, LRF दोन अत्यंत महत्त्वाच्या बाबी अधोरेखित

---

[49] EIB E&S हँडबुक 2013 चे परिच्छेद 272 व 274 पहा.

[50]EIB E&S मानक 1 पहा: संबंधित सुविधा आहेत (i) प्रवर्तकांच्या थेट मालकीच्या किंवा व्यवस्थापनाखालील संपत्ती व सुविधा, ज्याचा संबंध निधी पुरवठा केला जाणाऱ्या प्रकल्पविषयक कार्यांशी आहे; (ii); अशी कार्ये किंवा सुविधा ज्या प्रस्तावित प्रकल्पाच्या कार्यचालनासाठी करारबद्ध केलेल्या पक्षांच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील आहेत; किंवा (iii); ज्यांना प्रकल्पाचा भाग म्हणून EIB ने निधी पुरवलेला नाही आणि ज्या अलग कायदेशीर व्यक्ती होऊ शकतात (a) तरीही ज्यांची व्यवहार्यता व अस्तित्व केवळ प्रकल्पावर अवलंबून राहते, किंवा (b) ज्यांचा माल आणि सेवा प्रकल्पाच्या यशस्वी प्रचालनासाठी आवश्यक असतात.

करते, त्या अशा (i) आधारभूत LBS ची मर्यादित व्याप्ती[51] आणि (ii) प्रत्यक्ष LRF चे सूचक स्वरूप, ज्यात प्रस्तावित उदरनिर्वाहाची पुनःस्थापना/सुधारणा यांचे उपाय, पात्रता निकष, आणि त्यासोबत येणारे संरक्षक उपाय, ज्यांना अजून प्रवर्तक, SRA व स्थानिक समाजांनी सहमती द्यायची आहे, हे सर्व येतात. त्यामुळे, प्रकल्पाच्या EIB E&S मानकांच्या अनुपालनाच्या पुनःस्थापनेसाठी हे महत्त्वाचे आहे की:

- LRP **हा शक्य होईल तितका LRF शी सुसंगत पद्धतीने विकसित करून अमलात आणला आहे; आणि**
- LRP हा **शक्य होईल तितका सर्वसमावेशक असेल याच्या खात्रीसाठी EIB अजूनही प्रवर्तक/LRP कन्सल्टंट आणि राज्य/स्थानिक अधिकाऱ्यांना** अजूनही **मदत करत आहे**.

3.2.15 तक्रार निवारण व्यवस्था EIB-CM यांनी LRP चा (i) विकास व (ii) अंमलबजावणीमधील विलंबही लक्षात घेतले आहेत, जे सुरुवातीला EIB ला अनुक्रमे जुलै 2022 व जुलै 2023 मध्ये अपेक्षित होते. EIB च्या सक्षम सेवांनी पुरवलेल्या माहितीमधून प्रवर्तकांना LRP प्रक्रियेमध्ये मदत करणाऱ्या सल्लागाराला जून 2023 मध्ये निवडण्यात आले असून त्याने प्रत्यक्ष जागेवरील आपले काम सुरू केले आहे. खालील गोष्टींची खात्री करण्यासाठी EIB प्रक्रियेचे बारकाईने संनियंत्रण करणे महत्त्वाचे आहे:

- LRP चा विकास हा संस्थात्मक स्टेकहोल्डर्स व PAPs यांच्या सर्वसमावेशक सल्ल्यावर आधारित आहे आणि नष्ट झालेले उदरनिर्वाह शाश्वत पद्धतीने पूर्ववत करण्यासाठी त्याला भरपूर वेळ देण्यात आला आहे; आणि

- प्रकल्पाच्या EIB E&S मानकांच्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी पुनर्वसनाच्या जागांवरील सुरक्षेसाठी तातडीचे उपाय आणि सर्वात असुरक्षित PAPs च्या उदरनिर्वाहांचे पुनःस्थापना उपाय तातडीने करण्यात आले आहेत.

# 4 निष्पत्ती आणि सुधारणेसाठी सूचना

4.1 आपले आणि निष्कर्षांच्या आधारे तक्रार निवारण व्यवस्था खालील सारणींनुसार सुधारणांसाठी तिच्या शिफारसी आणि सूचना पाठवते.

*सारणी 3: EIB E&S मानकांचे अनुपालन न केल्याचे आरोप, उप-आरोप, निष्पत्ती आणि सुधारणांसाठी सूचना*

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| प्रवर्तकांनी SRA सोबत औपचारिक करार न करता अतिरिक्त जमिनीचे अधिग्रहण केले | लागू नाही | निराधार | लागू नाही |
| भरपाईसाठी अपात्रता | RAP आणि EIB E&S मानकांसोबत पात्रता निकषांची सुसंगतता | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>प्रकल्पामुळे नकारात्मक परिणाम झालेली कोणतीही व्यक्ती नुकसान भरपाई, उदरनिर्वाहाचे पुनःस्थापन आणि/किंवा | LRP शक्य तितकी सर्वसमावेशक असेल याच्या खात्रीसाठी EIB ने प्रवर्तक/LRP सल्लागार आणि राज्य/स्थानिक अधिकाऱ्यांना पाठिंबा देणे चालू ठेवावे (डिलिव्हरेबल: LRP या समस्येची दखल |

[51] LBS हे प्रवर्तकांच्या आर्थिक जबाबदारीच्या अंतर्गत येणाऱ्या पात्र PAFs पैकी फक्त 59.4% ना समाविष्ट करते. याखेरीज जे PAFs एकत्रिकृत R&R धोरणांतर्गत अपात्र घोषित करण्यात आले होते पण 2019 RAP व EIB E&S मानकांतर्गत कदाचित पात्र ठरू शकले असते, त्यांना LBS मध्ये समाविष्ट करण्यात आले नव्हते.

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | हक्कांचे एकक | पुनर्वसनासाठीची इतर मदत यासाठी पात्र आहे[52].<br><br>एकत्रिकृत R&R धोरण आणि SRA सर्वेक्षणाने EIB ने मान्य केलेल्या RPF/RAP ला प्रतिस्थापित केले.<br>पात्रता प्रकल्पग्रस्त लोकांच्या (EIB मानक) च्या ऐवजी प्रकल्पग्रस्त परिवार/झोपड्यां (राष्ट्रीय मानक) याच्या आधारावर होती. PAPs म्हणजे एका छताखाली राहणारी कुटुंबे किंवा केवळ कुटुंबांचे प्रमुख नसतात[53]. त्यामुळे PAPs च्या संख्येला फक्त झोपड्या/PAFs च्या संख्येच्या समान धरता येणार नाही.<br><br>पात्र असलेल्या PAFs ना कळवण्यात आले की पुनर्वसन केलेल्या घराची मालकी SRA ने निवडलेल्या फक्त एकाच कायदेशीर वारसाला हस्तांतरित केली जाईल.<br><br>हक्कदारीचे एकक EIB च्या मानकांचे अनुपालन करत नव्हते, पण LBS व LRF मधून पुनर्वसनाचे सामाजिक-आर्थिक परिणाम आणि त्यानंतरच्या पुनर्वसन कार्यनीतीशी जुळवून घेणे याच्या आकलनाच्या दिशेने चांगली प्रगती दिसून येते. | घेते आणि बँकेसाठी ते समाधानकारक आहे, Q2 2024 + LRP चे अंमलबजावणीचे लेखा परीक्षण, संभाव्य कृती योजनेसह (Q3 2025, LRP च्या अंमलबजावणीच्या अनुसार).<br><br>(सूचना) |
| | अंतिम तारीख | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>SRA तत्वांच्या अंतर्गत प्रारंभी दिलेली अंतिम तारीख वर्ष 2000 होती. त्यानंतर अखेरीस असे ठरवण्यात आले की पुणे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाच्या पहिल्या अधिसूचनेची तारीख ही अंतिम तारीख समजली जावी (2016).<br><br>हीच अंतिम तारीख RAP मध्येही दिली आहे. तथापि, हक्कदार नसलेल्यांसाठी, 2019 RAP ही अंतिम तारीख जनगणनेच्या सर्वेक्षणाशी जोडते[54]. | EIB ने अशी खात्री करण्यासाठी प्रवर्तकांसह सक्रियपणे काम करावे, की PAPs च्या पात्रतेची पडताळणी पुरेशी बारकाईने केली आहे, LRP सल्लागाराने PAPs ना राहत्या घराचा पुरावा देण्याच्या बाबतीत मदत केली आहे, पडताळणी दस्तऐवजित आहे, आणि ती सामाजिक संदर्भ व वाया गेलेला वेळ विचारात घेते (RAP प्रवर्तक प्रगती अहवाल, 2 री तिमाही, 2024).<br><br>EIB ने अशी पुष्टी करण्यासाठी प्रवर्तकांसह काम करावे, जे 26 PAFs अपुऱ्या दस्तऐवजांमुळे अपात्र ठरले होते, त्यांनी |

[52] EIB E&S मानके, मानक 6 § 33.

[53] EIB E&S मानके, मानक 6 §§ 16, 47 व 51. §16 नुसार, लिंगविषयक गतीशीलतेचे योग्य निरीक्षण करावे लागेल आणि त्याला संपूर्ण प्रक्रियेमध्ये विचारात घ्यावे लागेल. §51 यावर भर देते की सल्लामसलत करण्याचे काम फक्त समाजाच्या आणि/किंवा कुटुंबांच्या मुख्य व्यक्तींपुरतेच मर्यादित ठेवल्यास घरांमध्ये महत्वाच्या लिंगविषयक गतीशीलतेकडे दुर्लक्ष होते आणि त्यामुळे, महिलांचे स्थान आणखी बिघडत जाते; त्यामुळे फक्त महिलांसोबत स्वतंत्रपणे सल्लामसलत करणे सुद्धा महत्त्वाचे आहे, त्यातही शक्य झाल्यास विविध वयोगटांमध्ये विभागणी केल्यास अधिक चांगले.

[54] RAP प्रवर्तकांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे येथे. जुलै 2019 पासूनचे RPF येथे आणि येथे उपलब्ध आहे (सर्व लिंक्स 21 डिसेंबर 2022 रोजी वापरण्यात आल्या).

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | | 2021 च्या एकत्रिकृत R&R धोरणाने हक्कदार नसलेल्यांसाठी अंतिम तारखेच्या स्वरुपात पात्रता सिद्ध करण्यासाठीचे निकष अंतर्भूत केले, जे 2019 च्या RAP ने निश्चित केलेल्या निकषांशी सुसंगत नाहीत, EIB व मानक 6 साठी समाधानकारक असल्याची पुष्टी केली आहे. | पुरवलेल्या कागदोपत्री पुराव्याचा आढावा समाधानकारक होता. (डिलिव्हरेबल: 26 PAFs च्या पात्रता पुनरावलोकनाच्या माहितीचे पॅकेज EIB सामाजिक तज्ज्ञाच्या मते समाधानकारक असल्याची पुष्टी, Q2 2024).<br><br>(सूचना) |
| | निवासाचा पुरावा | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>एकत्रिकृत R&R धोरणाने राहत्या घराच्या पुराव्याच्या स्वरुपात पात्रता सिद्ध करण्यासाठीचे निकष अंतर्भूत केले, जे 2019 च्या RAP ने निश्चित केलेल्या निकषांशी सुसंगत नाहीत. अनौपचारिक परिस्थितीत राहत असलेल्या झोपडपट्टी रहिवासींनी 2016 पासूनच्या जुन्या वीज बिलासारख्या दस्तऐवजांच्या नोंदी ठेवलेल्या नसू शकतील.<br><br>EIB E&S मानके व RAP अंतर्गत आवश्यक असलेले जनगणना सर्वेक्षण हेच PAPs ची पात्रता ठरवण्यासाठीचा आधार असणे अपेक्षित आहे.<br><br>PAFs ना राहत्या घराच्या पुराव्याला जोड म्हणून इतर कोणतेही कागदपत्र देण्याची परवानगी द्यायला हवी होती, ज्यामुळे अंतिम तारखेपूर्वी ते EIB ने निधी पुरवलेल्या प्रकल्पामुळे प्रभावित भागामध्ये रहिवासी असल्याचे निश्चित होऊ शकले असते. | |
| अपुरी भरपाई | पुनर्वसनाच्या निवासांच्या वाटणीमध्ये असुरक्षित PAPs च्या खास गरजा विचारात घेणे | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>निवासांच्या वाटपामध्ये PAPs ची दिव्यांगत्वे आणि अन्य असुरक्षिततांचा विचार करण्यात आला नाही.<br><br>LBS च्या मर्यादित आवाक्याच्या अधीन राहून, LRF हे असुरक्षित PAPs च्या नेमून दिलेल्या बदली घरांच्या परिणामांचे फरक विचारात घेण्यामध्ये प्रगती दाखवत आहे, | LRP प्रक्रियेचा एक भाग म्हणून EIB ने,असुरक्षित PAPs च्या नेमून दिलेल्या बदली घरांचे परिणाम शोधून त्यांची दखल घेण्याच्या दृष्टीने प्रवर्तक/LRP सल्लागार आणि राज्य/स्थानिक अधिकाऱ्यांना पाठिंबा देणे चालू ठेवावे (डिलिव्हरेबल: LRP या समस्येची दखल घेते आणि बँकेसाठी ते समाधानकारक आहे, Q2 2024 + LRP चे अंमलबजावणीचे लेखा परीक्षण, संभाव्य कृती योजनेसह (Q3 2025, LRP च्या अंमलबजावणीच्या अनुसार). |

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | | विशेषतः महिला व वयोवृद्ध लोकांच्या बाबतीत. | (सूचना) |
| | बदली घरांमधील दोष | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>PAPs ना पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यांच्यासहित पुरेशा प्रमाणात सुरक्षित घरे वापरण्यास मिळतील याची खात्री झाली पाहिजे[55].<br><br>डिसेंबर 2021 मध्ये प्रवर्तकांना बदली घरांच्या बाबतीत गंभीर समस्या दिसल्या व त्यांनी त्या SRA ला कळवल्या. सुधारणा करण्याबद्दल अनेकदा पत्रव्यवहार होऊनही परिस्थिती बहुतांशी तशीच राहिली.<br><br>LRF व प्रवर्तक अशा दोघांच्याही एप्रिल 2023 मधील रिपोर्टिंगमध्ये पर्यायी गृहबांधणीच्या ठिकाणांच्या मानकांच्या बाबतीत अपडेट पुरवण्यात आले आहे. काही दुरुस्त्या झाल्या आहेत, तरी अनेक समस्या तशाच राहिल्या, यामध्ये सांडपाणी प्रक्रिया संयंत्र प्रचालनाचे काम (आणि तिचे खर्च), अग्निशमन आणि सुरक्षा व्यवस्था न चालणे, पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यातील त्रुटी, इमारत देखभालसंबंधीच्या समस्या, आणि वीजबिलांचे खर्च समाविष्ट आहेत.<br><br>जून 2023 मध्ये EIB सेवांनी असेही कळवले की SRA ला दुरुस्त्यांच्या कामासाठी संरचनात्मक इमारत लेखापरीक्षण सादर करण्यात आले होते.<br><br>प्रत्येक स्थलांतरित कुटुंबाला एकदाच देण्याचा RAP ने पुरवलेला पुनर्वसन भत्ता भारतीय रु. 50 000 PAFs ना देण्यात आला नाही. एकत्रिकृत R&R धोरणाशी सुसंगत पद्धतीने प्रत्येक रहिवासी एककासाठी एक समान रक्कम देखभाल खर्च म्हणून आणि स्थलांतरित ठिकाणी सहकारी गृहसंस्था निर्माण करण्यासाठी SRA ला हस्तांतरित करण्यात आली आहे. अजूनपर्यंत कोणत्याही गृहसंस्था निर्माण करण्यात आलेल्या नाहीत. | गृहसंस्थांची माहिती मिळेपर्यंत EIB ने प्रवर्तकांना त्यांच्या प्रगती अहवालांमध्ये अपडेट पुरवणे बंधनकारक करावे, यात प्रवर्तक आणि/किंवा इतर राष्ट्रीय/स्थानिक अधिकाऱ्यांनी दुरुस्ती/देखभालीचे काम केल्याचा कागदोपत्री पुरावाही समाविष्ट आहे:<br><br>- निवासाच्या परिस्थिती त्वरित राष्ट्रीय मानकांच्या स्तरावर परत आणाव्या याची खात्री करणे;<br>- असुरक्षित PAPs वरील बदली घरांमधील दोषांच्या विभिन्न प्रतिकूल परिणामांची दखल घेणे;<br>- लेखा परीक्षकांनी प्रमाणित करणे की बिल्डिंग ऑडिटमध्ये आढळलेली दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.<br><br>(प्रवर्तकांचा प्रगती अहवाल आणि दुरुस्ती सुरू झाल्याची पुष्टी करणारे आणि गृहसंस्थांबद्दलचे लेखा परीक्षण अहवाल पाठवण्याचे कार्य सुरू झाले आहे, Q2 2024).<br><br>(सूचना) |
| | वाहतूक खर्चाचा समावेश | **प्रकल्पामध्ये अनुपालन न केल्याचे आढळून आले नाही** | लागू नाही |

[55] EIB E&S मानके, मानक 6, § 48.

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | | ऑक्टोबर 2021 मध्ये प्रवर्तकांनी कळवले की त्यांनी 757 PAFs ना सिव्हिल कोर्टच्या भागापासून सुमारे 10 किमी दूर असलेल्या पुनर्वसन स्थानापर्यंत नेण्यासाठीच्या प्रत्यक्ष वाहतूक खर्चापोटी प्रति PAF भारतीय रु. 4 000 रोख खर्च केले आहेत.<br><br>RAP च्या अंतर्गत, प्रत्येक PAF ला दिवाणी न्यायालयाच्या क्षेत्रापासून 10 किमीच्या आत असलेल्या पुनर्वसन स्थानांसाठी वाहतूक/शारीरिक साहाय्य यासाठी भारतीय रु. 20 000 मिळायला हवे होते.<br><br>पुण्यामध्ये एक बेडरूम फ्लॅटच्या पुनर्वसनाच्या खर्चाचा अगदी ढोबळ अंदाज जो एका ऑनलाईन खर्च दर सारणीने पुरवला आहे (2022) त्यानुसार PAFs ना देण्यात आलेली वाहतूक भत्याची रक्कम सरासरी वाहतूक खर्चाच्या रकमेच्या बरीचशी जवळ होती आणि त्यामुळे ती विशेषरीत्या अवाजवी नव्हती[56]. | |
| | **बालकांचा शिक्षणाचा हक्क** | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>प्रवर्तकांनी खात्री करावी की पुनर्वसन भागामध्ये बालकांसाठी शिक्षणसुविधा आणि बालसंगोपन सुविधा उपलब्ध आहेत[57].<br><br>बदली घर झोपडपट्ट्यांपासून सुमारे 10 किमी दूर आहे. मार्च 2022 मध्ये प्रवर्तकांनी कळवले की पुणे महानगरपालिकेने दिवाणी न्यायालय क्षेत्रा पर्यंत सकाळी दोन आणि संध्याकाळी एक बस पाठवणे सुरू केले होते आणि SRA जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना PAFs च्या बालकांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची विनंती केली होती.<br><br>मात्र एका EIB सल्लागाराला मे 2022 मध्ये आढळलेल्या आणि LBS ला आढळलेल्या परिस्थितीवरून दिसते की PAFs शाळेच्या वाहतूक खर्चामध्ये वाढ झाली, सरकारी शाळांमध्ये प्रवेशांचे प्रमाण घटले आणि खाजगी शाळांमध्ये ते वाढले. | संबंधित PAPs ची असुरक्षितता लक्षात घेता, EIB ने आताच, LRP च्या विकासादरम्यान बालकांचा शिक्षणाचा हक्क अमलात आणण्याशी संबंधित अंतरिम उदरनिर्वाह पुनःस्थापनेचे उपाय करण्यासाठी प्रवर्तकांशी सक्रियपणे काम करावे (डिलिव्हरेबल: LRP या समस्येवर काम करत आहे आणि ते बँकेसाठी समाधानकारक आहे, 2 री तिमाही 2024) + LRP अंमलबजावणीचे लेखा परीक्षण, संभाव्य कृती योजनेसह (Q3 2025 LRP ने अंमलबजावणी करण्यावर अवलंबून).<br><br>(सूचना) |

[56] भारतीय रु.2 000 – 7 000 10 किमी पर्यंत आणि भारतीय रु. 3 000 ते 8 000, 11 ते 20 किमी पर्यंत. पहा पॅकर्स अँड मुव्हर्सचे पुण्यातील चार्जेस, खर्च दर तालिका 2022 Packers and Movers Pune Charges, Cost Rate Chart 2022 (shiftinindia.com)

[57] EIB E&S मानके, मानक 6 §48.

| आरोप | उप-आरोप | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | | LRF ने LRP प्रक्रियेचा एक भाग म्हणून विचार करण्यासाठी काही उपाय शोधले आहेत, जे बालकांच्या शिक्षणाशी संबंधित PAFs वरील सध्याच्या आर्थिक परिणामांवर उपाय करण्याच्या दृष्टीने आहेत. | |
| EIB ला पूर्वसूचना न देता सक्तीने निष्कासने | लागू नाही | **प्रकल्पामधील अनुपालन न झाल्याच्या घटना आढळल्या, बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात निराधार.**<br><br>आगामी निष्कासनांची न्यायालयाने अधिकृत केलेली सार्वजनिक सूचना ऑगस्ट व ऑक्टोबर 2021 मध्ये देण्यात आली. निष्कासने नोव्हेंबर व डिसेंबर 2021 मध्ये करण्यात आली. मात्र सक्तीची वैध निष्कासने EIB ला पूर्वसूचना न देता झाली, त्यामुळे EIB E&S मानक 6 चे अनुपालन झाले नाही[58].<br><br>सक्तीच्या निष्कासनांची सूचना मिळताच EIB ने माहितीमधील फरक सांधण्यासाठी व EIB च्या संनियंत्रणामध्ये दिसलेल्या चिंतांवर काम सुरू करण्यासाठी प्रवर्तकांशी त्वरित संपर्क साधला. या संपर्काचा भाग म्हणून EIB ने, EIB कडे माहितीचा पारदर्शक प्रवाह नसताना करण्यात आलेल्या सक्तीच्या निष्कासनांच्या बाबतीत शून्य सहनशीलता असल्याचा पुनरुच्चार केला. | लागू नाही (LRP अमलात आणण्यासाठीच्या वरील कृतींनी अंतर्भूत केले) |

*सारणी 4: समस्या, निष्पत्ती, शिफारसी आणि सुधारणांसाठीच्या सूचना यांचा गोषवारा*

| समस्या | उप-समस्या | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| प्रकल्पाचे मूल्यांकन | प्रवर्तकांची सामाजिक क्षमता | निराधार<br><br>EIB ने संबंधित जोखमीची दखल, RAP च्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प अंमलबजावणी टीममध्ये सामाजिक तज्ज्ञ असले तरच कोणतेही निधी वितरण केले जाईल अशी अट घालून घेतली आहे. | लागू नाही |
| | सध्या अस्तित्वात असलेला संस्थात्मक आराखडा आणि | साधार | आपल्या कार्यपद्धतींमध्ये किंवा EIB कर्मचाऱ्यांसाठीच्या एका पुनर्वसनविषयक |

[58] EIB E&S मानके, मानक 6 §54 आणि 55.

| समस्या | उप-समस्या | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | संबंधित राष्ट्रीय एजन्सी | EIB च्या मूल्यांकनामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थात्मक आराखड्याचे मूल्यांकन केले नाही आणि प्रकल्पाच्या सामाजिक परिणामांच्या मूल्यांकन/व्यवस्थापनामधे सहभागी असलेल्या संबंधित राज्य/स्थानिक एजन्सी त्यामध्ये सापडल्या नाहीत[59]. | मार्गदर्शनपर टीपेमध्ये EIB हे, RAP च्या मूल्यांकनाचा अपेक्षित स्तर, संस्थात्मक आराखडा, EIB ने निधी पुरवलेल्या प्रकल्पांमुळे कराव्या लागलेल्या पुनर्वसनामध्ये सहभागी बहिस्थ पक्षांची सामाजिक व्यवस्थापनाची जबाबदारी, आणि बँकेला अपेक्षित असलेले विश्लेषण, ज्यासाठी 2022 EIB E&S मानक 6 परिच्छेद 62 ची अंमलबजावणी आवश्यक असेल, स्पष्ट करेल[60].<br><br>(शिफारस) |
| प्रकल्पाची देखरेख | प्रवर्तकांची सामाजिक क्षमता | निराधार<br><br>जेव्हा ESIA व RAP एकत्र आणण्यात आले तेव्हा सामाजिक तज्ज्ञ उपस्थित होते. जनरल कन्सल्टंट्सनी या अभ्यासांच्या अंमलबजावणीला पाठिंबा दिला. निधी वितरणांच्या संबंधाने, प्रवर्तकांनी प्रमाणित केले की प्रकल्प अमलात आणण्यासाठी त्यांच्याकडे पुरेशी पर्यावरणीय व सामाजिक संसाधने आहेत आणि बँकेला त्यांनी एक समाधानकारक RAP प्रगती अहवाल पाठवला. सामाजिक बाबीचा समावेश करत असलेल्या जनरल कन्सल्टंट्सच्या वेळी एक पर्यावरण तज्ज्ञही उपस्थित होता. बँकेला निष्कासने झाल्याचे समजताच प्रवर्तकांनी अनुपालनातील अंतरांचे मूल्यांकन करून LRP तयार करण्यासाठी अतिरिक्त सामाजिक तज्ज्ञ नियुक्त केले. | EIB ने लक्षणीय प्रमाणात पडताळणी करावी, की पुढील निधी वितरणांपूर्वी प्रवर्तकांच्या प्रकल्प अंमलबजावणी टीममध्ये केवळ याच कारणासाठी नेमलेले सामाजिक तज्ज्ञ आहेत, जे EIB ने सांगितलेल्या उपायात्मक कृती अमलात आणतील.<br><br>(सूचना) |
| | दिवाणी न्यायालय स्थानकाचे सामाजिक परिणाम | निराधार<br><br>जरी सामाजिक जोखमीच्या (जसे PAPs च्या संख्येत बदल) खुणा दिसत असल्या तरी बँक प्रकल्प अंमलबजावणीची देखरेख अधिक पुढाकार घेऊन करू शकली असती. पुनर्वसन आराखड्यातील बदलाबाबत बँकेला कळवण्याची (येथे RAP च्या जागी एकत्रित R&R धोरण आणणे) आणि कायदेशीर सक्तीची निष्कासने करण्याची जबाबदारी प्रवर्तकांची आहे. COVID च्या वैश्विक महामारीमुळे आलेल्या प्रवासांवरील मर्यादांमुळे साईटवर भेटी देणे, प्रत्यक्ष जागी तपासण्या करणे, आणि अनेक स्टेकहोल्डर्सच्या साठी तपासण्या करणे हेसुद्धा विचारात घेतले पाहिजे. बँकेला RAP च्या जागी एकत्रित R&R धोरण आणणे आणि निष्कासने | EIB ने प्रवर्तक/LRP सल्लागारांबरोबर सक्रियपणे संपर्क साधून एका सर्वसमावेशक LRP च्या विकासाला पाठिंबा देत राहावे. (डिलिव्हरेबल: LRP या समस्येची दखल घेते आणि बँकेसाठी ते समाधानकारक आहे, Q2 2024 + LRP चे अंमलबजावणीचे लेखा परीक्षण, संभाव्य कृती योजनेसह (Q3 2025, LRP च्या अंमलबजावणीच्या अनुसार).<br><br>(सूचना) |

[59]पाहा EIB E&S Procedures, परिच्छेद 90

[60] पहा EIB पर्यावरणीय व सामाजिक मानके EIB Environmental and Social Standards, § 62

| समस्या | उप-समस्या | निष्पत्ती | शिफारस किंवा सूचना |
|---|---|---|---|
| | | याबाबत कळवताच बँकेने एक सुधारित देखरेख कार्यपद्धती अमलात आणली आणि सामाजिक तज्ज्ञ नेमणे, अनुपालनातील अंतरांचे मूल्यांकन आणि LRF मार्फत उपाय योजनांची विनंती करणे अशा कृती सुरू केल्या. म्हणून CM चा निष्कर्ष आहे की बँकेने कोणताही गैरकारभार केला नाही.<br><br>दिवाणी न्यायालय स्थानकाच्या आसपासच्या क्षेत्रात इच्छेविरुद्ध पुनर्वसन घडवून आणणारी पायाभूत सुविधा प्रकल्पाशी संबंधित नाही.<br><br>EIB E&S मानकांशी सुसंगत व त्यापलिकडे, LRF मध्ये असे समाजातील लोक आहेत ज्यांना दिवाणी न्यायालय स्थानकामुळे पुनर्वसन करावे लागले तसेच इतर लोक आहे जे इतर पायाभूत सुविधांमुळे प्रभावित झाले आहेत, ज्या प्रकल्पाशी संबंधित नाहीत, पण ज्यांना प्रवर्तकांच्या आर्थिक जबाबदारीच्या अधीन ठेवण्यात आले आहे.<br><br>एका सर्वसमावेशक LRF च्या स्थापनेमधून, प्रकल्पानेदिवाणी न्यायालयाच्या पुनर्वसनामुळे प्रभावित, तसेच प्रकल्पाशी संबंधित नसलेल्या अन्य पायाभूत सुविधांमुळे प्रभावित PAPs च्या उदरनिर्वाहाची पुनःस्थापना करण्याच्या बाबतीत मूल्यांकन आणि बांधिलकी या बाबतीत लक्षणीय प्रगती केली आहे. | |

**उपलब्ध उपाय:**

जे तक्रारदार EIB ने दिलेल्या तक्रारीच्या उत्तरामुळे समाधानी नसतील, ते युरोपियन लवादा (European Ombudsman) कडे EIB विरुद्ध गैरकारभाराची तक्रार दाखल करू शकतात[61].

[61] येथे उपलब्ध:.